

# अलांटी वेलांटी

पद्मिनी बिनीवाले

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क.

BVBK-0400774

बी.बी
नों. क्र. ६०५

# अलांटी पेलांटी

पद्मिनी बिनीवाले

किंमत दोन रुपये

अनंत प्रकाशन, पुणे

क्र. ६०५
विभाग बी. बी.
BVBK-0400774

*चि. पिंटूस*

—सुधा आत्या


प्रकाशिका :

**सौ. अर्चना अनंत टोळ**

अनंत प्रकाशन,

४३३/३ सारस्वत कॉलनी,

पुणे ४११ ००१.



© पद्मिनी बिनीवाले



प्रथमावृत्ती :

दसरा ७८

**किंमत दोन रुपये**

मुद्रक :

ले. कर्नल वि. वा. जोशी

सकाळ छापखाना,


५९५ बुधवार,

पुणे ४११ ००२.

मुखपृष्ठ,

सजावट, मांडणी:

ल. म. कडू




# अलांटी वेलांटी

अलांटी वेलांटी
नदीच्या पाण्यात
मासोळी धावते
उलटीसुलटी.

अलांटी वेलांटी
वेली या वाढती
उन्हात हलते
पालवी पोपटी.

अलांटी वेलांटी
पाखरे उडती
झाडाला हलती
सुंदर घरटी.



## कासव

तळ्यात पडलं पिवळं पान
त्यालाच आली एक मान
लुक्‌लुक् डोळे मानेवरती
लब् लब् लब् लब् ओठ हलती
पाठीवरती सुंदर नक्षी
शेपूट मात्र इवलीशी
चार पाय हलवत राहाते
बघता बघता तळाशी जाते




# ताई बसली चिरायला भाजी

ताई बसली चिरायला भाजी
'जपून बरं का' ओरडली आजी.



कैरीची फोड तोंडात कोंबली
हिरवी मिरची नाकाला झोंबली.
चिरता चिरता मध्येच थांबली
मीठ लावून काकडी खाल्ली.
भोपळ्याच्या केल्या जाड जाड फोडी
आई म्हणाली, 'अहा रे वेडी !'
कांद्याची साल सोलताना
हसत होती रडताना.
भाजीत मोठ्ठी अळी निघाली
'ईऽ' करून दूर पळाली.



# बघितलीय गंमत !


भोवऱ्याला असतो एकच पाय !
दुसऱ्या पायाचे कामच काय ?

फोनला असतो एकच कान
ऐकून ऐकून होतो हैराण !

तीन हात फिरवत भोवती
पंखा म्हणतो 'उकडतंय किती !'

गिरणीचे तोंड केवढे मोठ्ठे
पोते पोते गहू खाते !

मोराच्या पिसाऱ्याला शंभर डोळे
एकजात सगळे आंधळे !



# पान


पावसाच्या धारा   झराझरा आल्या
धरायला जाता   गळून गेल्या

पायरीवर पडलेली   चिमुकली गार
हाती घेता घेता   वितळली पार

कागदाची होडी   पाण्यात सोडली
बघता बघता   बुडून गेली

कुंडीतलं झाड   इवलंसं छान
त्याला मात्र आलं   हिरवं हिरवं पान





# शिक्षा


चन्द्र, सूर्य जुळे भाऊ
मुलखाचे खादाड खाऊ.
एकदा आईने केले लाडू
मोठ्यासाठी लागले भांडू.

लाडू नाहीच, मिळाली शिक्षा
आईनं उतरवला दोघांचा नक्षा.
‘ आकाशाचं अफाट अंगण
त्याला घालायचं रोज रिंगण ’
सूर्य दिवसा करतो वणवण
चन्द्राला होते रात्रीचे जागरण.



# चिंगुलं बाळ

आईचं बाळ चिंगुलं छान
चिटुकले पिटुकले त्याचे कान
इवलेसे डोळे घट्ट मिटतं
झोपेतसुद्धा हसत असतं
तोंडात त्याच्या दातच नाहीत
विसरला असेल बाप्पा घाईत
बरं झालं,
बिस्किट मागणार नाही
बदाम फोडता येणार नाही
काय बरं ठेवावं त्याचं नाव ?
गोष्टीमधला ‘ ठेंगूराव ’



# राजू


बुशकोट पँट
खिशाला बिल्ला
आमचा राजू
शाळेला चालला

पायात बूट
लालंलाल
पाण्याची बाटली
आणलीय काल

डब्यात खायला
बेसन लाडू
चित्र काढायला
रंगीत खडू

बाबांच्यासारखा
बांधलाय टाय
आईला करून
झालाय बाय्

केसांचा पाडलाय
सुंदर भांग
बस येईल आता
धरायची रांग!




# अभ्यास

चिमणी चिमणी पाणी घाल
कावळ्या कावळ्या वारा घाल

पाटी कित्ती लागते गार
मुंगी मुंगी रेघा मार
दादा तूच पाढे काढ
माझी फार दुखते दाढ

ताई काढेल बाराखड्या
काढणार नाही तिच्या खोड्या

तोंडी हिशेब करेल आई
मुळीच उत्तर चुकणार नाही

ढढ्ढोबाला मार्क शंभर
एक दिवस पहिला नंबर



# चित्र

पेन्सिल कागदावर ओढल्यावर
दोन रेघा मारल्यावर
एक निघाली पाऊलवाट
दोन बाजूला जंगल दाट

मग मोठ्ठं वर्तुळ काढलं
पाण्याचं छान तळं झालं

तळ्याच्या काठावर दोन त्रिकोण
डोंगर नाही म्हणेल कोण ?

दोन्ही डोंगरांना जोडून टाकले
सूर्यकिरण चौफेर फाकले


चार वेळा चार काढले
आकाशात कावळे उडायला लागले

डोंगराच्या पलिकडे कोणता गाव
त्याचं नाही बुवा माहीत नाव

# बाहुलीचं लग्न

एकदा बाहुलीचं ठरलं लग्न
नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न
बाहुलीची सासू बसली रुसून
नणंद पडली पाय घसरून.
भटजींना येसताच येईना सोवळं
बॅण्डवाल्यांनी केलं काळं.
नवरा बसला दडी मारून
मुहूर्ताची वेळ गेली टळून.
वऱ्हाडी म्हणतात काय करावे
लग्न नसले तरी जेवण हवे.
बोलाची कढी बोलाचा भात
आपला हात जगन्नाथ.





## कॅडबरी

बाबांनी आणलेली पाटी नि पेन्सिल
देऊन टाकली मी मोत्याला
अ आ इ ई गिरवायला.

बाबांनी आणलेलं पाढ्याचं पुस्तक
ते मी दिलं पोपटाला
बे कं बे म्हणायला.

बाबांनी आणलेली कॅडबरी
मागत होता शेजारचा रवी
ती मात्र मलाच हवी.




## जांभळाची बी

‘जर मी गिळली जांभळाची बी
काय होईल ते सांग बरं आई ?’

‘पोटात येईल मोठ्ठं झाड
दगड मारतील पोरं द्वाड

झाड लागेल हलायला
पोटात कळा लागतील यायला’

नको नको मी शहाणा होईन
सांगशील तस्सं वागत जाईन.



# कसं काय




कुठं निघालात
सरडेराव
' कुंपणापर्यंत
आमची धाव !'

मुंगीबाई एवढी
कसली हो घाई ?
' लेकीच्या लग्नाला
साखरच नाही !'

उंदिरमामा
कसं काय बोला
' चोरीचा मामला
हळूहळू बोंबला
पोलिसानं केलाय
पंचनामा ' !

नीमाऊ तुमची
बेत कशी ?
किती दिवसांची
ो उपाशी.'
ळूच म्हणाली
सत मिशी !

कसं काय चाललंय
बेडूकराव ?
' डरांव डरांव ?
पाण्यात वाहून
गेलाय गाव.'



बाल वाङ्मय विभाग
क्र. ८८.४. दिनांक ......
विषय
BVBK-0400774